महाराष्ट्र टाइम्स ९ जानेवारी २०१२

# पोदार कॉलेज सर्वोत्कृष्ट

**म. टा. प्रतिनिधी ➤ मुंबई**

## ➤ मुंबई विद्यापीठाचे पुरस्कार जाहीर
## ➤ ग्रामीण भागात पनवेलचे महात्मा फुले व बोर्डीचे मेहता कॉलेज सर्वोत्तम

मुंबई विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष २०१०-११साठी सर्वोत्कृष्ट कॉलेज, शिक्षक आणि सावित्रीबाई फुले सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. शहर विभागात माटुंग्याच्या पोदार कॉलेजला सर्वोत्कृष्ट कॉलेजचा ५० हजार रुपयांचा पुरस्कार जाहीर झाला असून ग्रामीण विभागात पनवेलमधील रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले कॉलेज आणि बोर्डीच्या एन. बी. मेहता सायन्स कॉलेज या कॉलेजांना पहिला क्रमांक विभागून देण्यात आला आहे.

सावित्रीबाई फुले सर्वोत्कृष्ट शिक्षक या पुरस्कारासाठी शहर विभागात माटुंग्याच्या डी. जी. रूपारेल कॉलेजमधील डॉ. नंदिनी दिवान यांची तर ग्रामीण भागात खेडमधील आयसीएस कॉलेजमधील डॉ. अनिता आवटी यांची निवड करण्यात आली आहे. सर्वोत्कृष्ट शिक्षक या विभागात विद्यापीठातील लाइफ सायन्स विभागातील डॉ. भास्कर जाधव यांना सन्मानित करण्यात आले. तर शहर विभागातील इन्स्टिट्युट ऑफ सायन्स, मुंबईचे संचालक डॉ. बी. जी. कुलकर्णी यांना गौरवण्यात आले आहे. ग्रामीण भागातून कणकवली कॉलेजच्या डॉ. खंडू कोतवाल यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या पुरस्कारांचे वितरण प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात करण्यात येणार आहे.